# भाषिक उल्लेखांमुळे आदिवासी ओळख बदलत नाही

## मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नागपूर** – केवळ भाषिक उल्लेखांमुळे आदिवासी ओळख बदलत नाही, असे निरक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

केवळ भाषिक उल्लेखांमुळे आदिवासी ओळख बदलत नाही, असे निरक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. 'तेलगू मन्नेवार' किंवा 'हिंदू मन्नेवार' केवळ भाषिक आणि प्रादेशिक संज्ञा आहे. ती वेगळी जात नाही असेही नागपूर खंडपीठाने म्हटले आहे. अकोल्यातील १७ वर्षीय सक्षम पट्टीचा 'मन्नेवार' अनुसूचित जमातीचा दावा मंजूर करत मुंबई उच्च न्यायालयाच्या



नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

समितीचा निष्कर्ष पूर्वग्रहदूषित अमरावती जात पडताळणी समितीने सक्षमचा दावा या आधी फेटाळला होता. यावर सक्षम पट्टीचा न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली असता समितीचा आदेश रद्द करत ६ आठवड्यांत वैधता प्रमाणपत्र देण्याचे निर्देश नागपूर खंडपीठाने दिले आहे तर 'तेलगू मन्नेवार', 'हिंदू मन्नेवार', 'मन्नेवार' आणि 'तेलगू' उल्लेखावरून होणारा समितीचा दावा फेटाळला होता. परिणामी, उच्च न्यायालयाचा नागपूर खंडपीठाने समितीचा निष्कर्ष कायद्याच्या दृष्टीने चुकीचा आणि पूर्वग्रहदूषित असल्याचे मत नोंदवत हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

'तेलगू मन्नेवार' किंवा 'हिंदू मन्नेवार' वेगळी जात नाही 'मन्नेवार'पूर्वी जोडलेले 'तेलगू', 'तेलंगी', 'हिंदू' भाषा, प्रदेश किंवा धर्म दर्शवणारे शब्द आहेत. त्यामुळे भाषा, प्रदेश किंवा धर्मामुळे मूळ आदिवासी जात बदलत नसल्याचे मत नागपूर खंडपीठाने नोंदवले आहे. ते सर्व एकाच अनुसूचित जमातीचे असल्याचे खंडपीठाचे म्हणणे आहे, तर १९२४ च्या खापर पणजोबांच्या जन्मदाखल्यात 'मन्नेवार' जातीची नोंद ग्राह्य धरली.

# लेखी आश्वासन न मिळाल्यास पुन्हा आंदोलन

## गुन्हे मागे घेण्यावरून सीजेपीचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – आंदोलक आणि आयोजकांवरील गुन्हे (एफआयआर) मागे घेण्याबाबत केंद्र सरकारकडून दिल्या जाणाऱ्या वचनबद्धतेच्या लेखी कराराची वाट पाहत असल्याचे 'कॉकरोच जनता पार्टी'ने (सीजेपी) सोमवारी सांगितले. मंगळवारपर्यंत हे लेखी आश्वासन न मिळाल्यास पुन्हा आंदोलन सुरू करण्यास भाग पाडले जाईल, असा थेट इशारा पक्षाने दिला आहे.

पत्रकार परिषदेला संबोधित करताना सीजेपीचे राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका म्हणाले की, जंतरमंतर येथील ३६ दिवसांचे आंदोलन मागे घेण्यापूर्वी सरकारसोबत झालेल्या तिसऱ्या फेरीच्या चर्चेत



या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाली होती. तिसऱ्या फेरीच्या चर्चेदरम्यान देशभरातील आंदोलक आणि आयोजकांवर नोंदवलेले सर्व एफआयआर मागे घेतले जातील आणि भविष्यात कोणत्याही आयोजक किंवा आंदोलकावर नवा गुन्हा नोंदवला जाणार नाही, यावर सहमती झाली होती, असे रांका यांनी स्पष्ट केले.

कराराची प्रतीक्षा ते पुढे म्हणाले की, सीजेपीने केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांच्याकडे कराराचा मसुदा सुपूर्द केला होता. कायदेशीर सल्लामसलतीनंतर सरकार मंगळवारपर्यंत लेखी करार सादर करेल, असे दोन्ही बाजूंकडून मान्य करण्यात आले होते. आम्ही सरकारकडून लेखी कराराची वाट पाहत आहोत. ज्येष्ठ केंद्रीय मंत्री या कराराचा मान राखतील, सर्व एफआयआर मागे घेतले जातील, कोणत्याही आंदोलकाची किंवा आयोजकाची पिळवणूक केली जाणार नाही आणि भविष्यात कोणतेही गुन्हे दाखल केले जाणार नाहीत, अशी आम्हाला आशा आहे, असे रांका म्हणाले आहे.

# दिल्ली लाठीमार प्रश्नावरून संसदेत गदारोळ, न्यायालयाने फटकारले




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – देशभरातील स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी केंद्र सरकारने सोमवारी लोकसभेत बहुप्रतीक्षित परीक्षा सुधारणा विधेयक मांडले.

मात्र, दिल्लीतील जंतरमंतर येथे पेपरफुटी विरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस लाठीमाराच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी आक्रमक भूमिका घेत चर्चेची मागणी केली. विरोधकांची जोरदार घोषणाबाजी आणि गोंधळामुळे संसदेचे कामकाज वारंवार तहकूब करावे लागले. दरम्यान, या प्रश्नी सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्याने नरेंद्र मोदी सरकार संसदेत व बाहेरही दबावात आल्याचे चित्र आहे. कामकाज तहकूब झाल्यानंतर विरोधी खासदारांनी संसद परिसरातही फलक हातात घेऊन निदर्शने केली. 'विद्यार्थ्यांवर अन्याय सहन करणार नाही' आणि 'लाठीमार करणाऱ्यांवर कारवाई करा', अशा घोषणांनी संसद परिसर दुमदुमून गेला.

# श्री क्षेत्र मुसळखेडा येथे श्री गुरुपौर्णिमा निमित्त महाप्रसाद व सुगम संगीताचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथून जवळच असलेल्या लाखो भाविकांचे श्रद्धास्थान श्री क्षेत्र मुसळखेडा येथे श्री गुरु पौर्णिमेनिमित्त येत्या २९ जुलै रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या शुभप्रसंगानिमित्त सकाळी ७ वाजेपासून ते रात्री ७ वाजेपर्यंत भव्य महाप्रसाद व अन्नदानाचा कार्यक्रम पार पडणार आहे.

सर्व दानदाते, श्री यशवंत बाबा भाविक भक्त व श्री यशवंत परिवार सेवाभावी संस्था मुसळखेडा यांच्या सहकार्याने या भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच सकाळी ९ ते रात्री ७ वाजेदरम्यान सुगम संगीताचा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. दर पौर्णिमेप्रमाणेच दुपारी १२ वाजता महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुपौर्णिमेच्या या पावन प्रसंगी आयोजित महाप्रसाद, महाआरती व सुगम संगीत कार्यक्रमाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे नम्र आवाहन सर्व दानदाते व श्री यशवंत परिवार सेवाभावी संस्था मुसळखेडा तसेच सर्व ग्रामवाशी चांदस, वाठोडा व मुसळखेडाच्या वतीने करण्यात आले आहे.



**वरुड** : माजी मुख्याध्यापक अरुण महल्ले यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना प्रा.अश्वपाल वानखडे, मदन तायवाडे, अमोल कुकडे, गणेश मानकर, गोपाल चिमोटे, राजु भडके, योगेश्वर खासबागे, यशपाल जैन व राजा देशमुख.

# औषध निरीक्षक भरती परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप

## एमपीएससी कडून गंभीर दखल : पोलिसांत तक्रार दाखल होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या औषध निरीक्षक (गट–ब) भरती परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटल्याचा प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) गंभीर दखल




घेतली असून, प्राप्त पुरावे आणि संबंधितांची निवेदने यांची सखोल पडताळणी करून संबंधितांविरोधात पोलिसांत रीतसर तक्रार दाखल करण्यात येणार असल्याची माहिती आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी दिली आहे. एफडीएने १५४ पदांसाठी २२ मार्च २०२६ रोजी राज्यातील सहा विभागीय मुख्यालयांवर ऑफलाइन पद्धतीने चाळणी परीक्षा घेतली होती. याचा निकाल १२ जून रोजी जाहीर झाला. २२ जुलै रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. दरम्यान, २१ जुलै रोजी गौरव पाटील या नावाने आयोगाला ई–मेलद्वारे परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचा आणि त्याचा लाभ एका उमेदवाराला झाल्याचा आरोप करण्यात आला. तक्रारीत ठोस पुरावे नसल्याने आयोगाने अधिक पुरावे मागविले. त्यानंतर २३ जुलै रोजी तक्रारदाराने काही पुरावे ई–मेलद्वारे आयोगाकडे सादर केले. या प्रकरणाची तपासणी सुरू असताना आयोगाने २७ जुलै रोजी तक्रारदार आणि ज्याच्यावर लाभ झाल्याचा आरोप करण्यात आला त्या उमेदवाराला चौकशीसाठी कार्यालयात बोलावले होते. मात्र, दोघेही चौकशीसाठी उपस्थित राहिले नाहीत. याचदरम्यान आयोगाला आणखी एक ई–मेल प्राप्त झाला.

# महाराष्ट्रात ८७.७९ टक्के मतदार अर्जांचे वाटप पूर्ण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेंतर्गत आतापर्यंत ८७.७९ टक्के मतदार–विशिष्ट गणना अर्जांचे वाटप करण्यात आले असून, ६०.४४ टक्के अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे, अशी माहिती



अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या बुलेटिननुसार, ३० जून ते ८ ऑगस्टदरम्यान ही मोहीम राबवली जात आहे. एकूण ९,७८,५४,०४९ मतदारांपैकी ८,५९,०५,००५ अर्जांचे वाटप झाले असून, ५,९१,४२,६२४ अर्जांचे डिजिटायझेशन झाले आहे. १ लाखांहून अधिक बूथ लेव्हल अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) हे काम केले जात आहे. अर्ज वाटपात हिंगोली जिल्हा ९९.९८ टक्क्यांसह राज्यात अव्वल आहे.

## जि.प.प्राथमिक शाळा चिंचरगव्हाण येथे

# आषाढी एकादशीनिमित्त वारी व वृक्षारोपण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – जि.प.प्राथमिक शाळा चिंचरगव्हाण येथे आषाढी एकादशीनिमित्त वारीचे आयोजन तसेच एक पेड मा के नाम उपक्रम अंतर्गत वृक्षारोपण पार पडले.

महाराष्ट्राची संस्कृती म्हणजे वारी याचे महत्त्व पटवून देण्याकरिता शाळेमध्ये विद्यार्थ्यांची वारी काढण्यात आली. विठ्ठल रुख्मिणीच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी वारीमध्ये सहभाग घेतला व एक छोटीशी दिंडी नृत्य सादर केले.

दिंडीतून झाडे लावा झाडे जगवा व एक पेड मा के नाम असा संदेश देत जनजागृती करण्याचा




प्रयत्न केला. आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीचा वारसा समोर चालावा व महाराष्ट्राच्या मराठी संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी ही छोटीशी विठ्ठल नामाची शाळा आषाढी एकादशीनिमित्त भरवण्यात आली.

दप्तर मुक्त शनिवार अंतर्गत व आषाढी एकादशीचे मुहूर्त साधून एक वेळ मागे नाम या उपक्रमा अंतर्गत माता पालक व त्यांच्या पाल्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मुक्ता सुरजुसे, मोनाली नेहारे, रुपाली पाटमासे, संध्या भडांगे, वर्षा फालके, मीरा मोरे, माता पालक उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक रंजनकुमार राठोड, सहाय्यक शिक्षिका स्वाती वानखडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता अंगणवाडी सेविका उज्वला आढावु, मदतनीस छबु घोरमाडे यांनी सहकार्य केले.


## जाहीर नोटीस

आम जनतेस सदर नोटीस व्दारे सुचित करण्यात येते की, मौजा वरुड–१ नगरपरिषद ता.वरुड जि.अमरावती येथील सर्वे नं.४९५/३ **Property type :** Other, Land Area 163.8700 Square Meter Address :- Plot No.7 As Per 7/12 EXTRACT PLOT NO.495/3/7, Servey No.495/3, House No.1282, mou2A Warud Part - 1 Tq.Warud Dist.Amravati Pin No.444906 त्यामध्ये असलेले घर पुर्ण हक्कासह सुधाकर देवरावजी देशमुख रा.विजय नगर, वरुड ता.वरुड, जि.अमरावती यांनी दस्त क्रमांक No.1 AMT 1-439-2026 दि.२७/७/२०२६ या दस्तावेद्वारे सदर मालमत्ता इक्विटस स्मॉल फायनान्स बँक शाखा वरुड यांच्याकडे गहाण करुन दिलेली आहे.

करीता सदर जाहीर नोटीस देत आहे.

दि.२८/०७/२०२६
वरुड

सुधाकर देवरावजी देशमुख
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
मोबा.८३९०८८८३३२